**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**

खडी, क्रेशन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)

मो. नं. 9271713368,
9860330587



दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे






वर्ष ५ ▪ अंक ३०२ ▪ बुधवार २ सप्टेंबर २०२६ ▪ पाने ४ ▪ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


## विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी घेतली पद्मभूषण अण्णा हजारे यांची भेट

### प्रकृतीची आस्थेने केली विचारपूस



**मुंबई –** महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आज मुंबई येथील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये ज्येष्ठ समाजसेवक, पद्मभूषण अण्णा हजारे यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांनी अण्णा हजारे यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस करून त्यांच्या प्रकृतीबाबत डॉक्टरांकडून तसेच संबंधितांकडून माहिती जाणून घेतली.

अण्णा हजारे यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, त्यांना उत्तम आरोग्य लाभावे, यासाठी प्रा. राम शिंदे यांनी सदिच्छा व्यक्त केली. अण्णांच्या प्रकृतीची विचारपूस करताना त्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

समाजहित आणि देशहितासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे अण्णा हजारे हे महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचे प्रेरणास्थान आहेत. ग्रामविकास, सामाजिक प्रबोधन, भ्रष्टाचारविरोधी लढा, स्वच्छता आणि लोकसहभागाच्या माध्यमातून त्यांनी समाजजीवनात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. निःस्वार्थ सेवाभाव, साधी जीवनशैली, संघर्षाची वृत्ती आणि समाजहितासाठीची त्यांची अविरत धडपड ही सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.

अण्णा हजारे यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करणे हा आपुलकीचा आणि जिव्हाळ्याचा क्षण असल्याचे प्रा. राम शिंदे यांनी सांगितले. अण्णांचे विचार, मार्गदर्शन आणि आशीर्वाद हे समाजासाठी कार्य करणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहिले आहेत. त्यांच्या कार्यातून समाजासाठी प्रामाणिकपणे आणि निःस्वार्थ भावनेने काम करण्याची प्रेरणा मिळते, असेही त्यांनी नमूद केले.

### फॉर्च्युनरच्या व्यवहारात साडेसहा लाखांची फसवणूक

# कर्जतच्या माजी नगराध्यक्ष पतीला तोफखाना पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**टोयोटा फॉर्च्युनर कारच्या खरेदी-विक्री व्यवहारात ३४ लाख ५० हजार रुपयांचा सौदा करून उर्वरित ६ लाख ५५ हजार रुपयांची रक्कम न देता वाहनाची परस्पर विल्हेवाट लावल्याप्रकरणी कर्जत येथील माजी नगराध्यक्षांचे पती सचिन विठ्ठलराव घुले (रा. पाटील गल्ली, कर्जत) यांच्याविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्यांना अटक केली आहे.

या प्रकरणी कृष्णा दगडू शिंदे (वय ४१, रा. आदित्य चिंतामणी कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शिंदे हे जमीन खरेदी-विक्रीचा ▪ पान ४ वर



आरोपी सचिन घुले

**उर्वरित रक्कम न देता लावली फॉर्च्युनरची परस्पर विल्हेवाट**

फिर्यादी शिंदे यांनी घुलेंकडे उर्वरित पैशांची मागणी केली किंवा फॉर्च्युनर परत देण्यास सांगितले असता, घुले यांनी सदर वाहन दुसऱ्याच व्यक्तीला देऊन तिची परस्पर विल्हेवाट लावल्याचे निष्पन्न झाले. आपली आर्थिक फसवणूक व विश्वासघात झाल्याचे लक्षात आल्यानंतर कृष्णा शिंदे यांनी तोफखाना पोलिसांत धाव घेत तक्रार नोंदवली.

## श्रीरामपूर व राहाता तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने श्रीरामपूर आणि राहाता पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांवर छापे टाकून २० लाख ३० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत चार आरोपींवर एकूण पाच गुन्हे दाखल ▪ पान ४ वर



## महापालिका रुग्णालयाच्या आरक्षणावर खासगी हॉस्पिटलची परवानगी शासनाच्या रडारवर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडीतील महापालिका रुग्णालयासाठी विकास आराखड्यात आरक्षित असलेल्या जागेवर खासगी रुग्णालयाला विकास व बांधकाम परवानगी देण्यात आल्याचे प्रकरण आता नगरविकास विभागाच्या वरिष्ठ स्तरावरील परीक्षणाखाली आले आहे. सामाजिक कार्यकर्ते शेख शाकीर यांनी प्रधान सचिवांकडे केलेल्या पाठपुराव्यानंतर शासनाने नगररचना संचालकांसह संबंधित वरिष्ठ कार्यालयांकडून स्वयंस्पष्ट अभिप्राय, सविस्तर अहवाल आणि विकास योजनेचा भाग ▪ पान ४ वर



## लेखी आश्वासनानंतर खासदार नीलेश लंके यांचे उपोषण मागे

### शिक्षक पदभरती, अशैक्षणिक कामांचा भार व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीबाबत प्रशासनाची कार्यवाही । शासनाकडे प्रस्ताव सादर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरणे, शिक्षकांवरील वाढता अशैक्षणिक कामांचा भार कमी करणे आणि विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान थांबविणे या मागण्यांसाठी खासदार नीलेश लंके यांनी सुरू केलेले उपोषण मंगळवारी उशिरा मागे घेतले. माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने लेखी आश्वासन देण्यात आल्यानंतर तसेच शासनस्तरावरील मागण्यांबाबत राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

खासदार लंके यांनी १ सप्टेंबरपासून अहिल्यानगर जिल्हा परिषद कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. जिल्ह्यात शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असून त्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचा मुद्दा त्यांनी आंदोलनातून उपस्थित केला होता. तसेच कार्यरत शिक्षकांवर विविध अशैक्षणिक कामांचा वाढता भार टाकला जात असल्याने अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळत नसल्याची भूमिका त्यांनी मांडली होती.

जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या माध्यमिक शाखेने दिलेल्या लेखी माहितीनुसार, जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमधील रिक्त शिक्षक पदांची भरती प्रक्रिया पवित्र पोर्टलमार्फत सुरू आहे. सन २०२६ मधील भरती प्रक्रियेत जिल्ह्यातील १५१ संस्थांच्या एकूण ९६३ पदांसाठी जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. पहिल्या टप्प्यात विनामुलाखत प्रक्रियेद्वारे १४ संस्थांमधील ३३१ रिक्त पदांसाठी २७० उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. उर्वरित ६१२ पदांसाठी मुलाखतीसह निवड प्रक्रिया पहिला टप्पा पूर्ण झाल्यानंतर राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्ह्यातील सुमारे १९४ संस्थांनी अद्याप पवित्र पोर्टलवर जाहिराती प्रसिद्ध केलेल्या नाहीत. तसेच ३० अल्पसंख्याक संस्थांमधील रिक्त पदे व भरती प्रक्रियेबाबत आढावा घेऊन पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येणार आहे. नियमित शिक्षकांच्या जागी अन्य शिक्षकांकडून अध्यापन करून घेतले जात आहे का, याचीही क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत पडताळणी करण्यात येणार असून आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात येणार असल्याचे माध्यमिक शिक्षण विभागाने कळविले आहे.

शिक्षकांचा प्रत्यक्ष अध्यापनासाठीचा वेळ आणि अशैक्षणिक कामांमध्ये जाणारा वेळ याचा आढावा घेण्यात येणार आहे. त्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणाऱ्या परिणामाचाही अभ्यास करण्यात येणार असून स्तंभालेखासह सविस्तर माहिती पुढील आठ दिवसांत खासदार लंके यांना देण्याचे लेखी आश्वासन प्रशासनाने दिले आहे. प्राथमिक ▪ पान ४ वर

### महिला व बालकल्याण समितीच्या पहिल्याच महासभेत

# २ कोटी ५५ लाखांच्या विकासकामांना मंजुरी

### आरोग्य, शिक्षण, क्रीडा, बचत गटांसह अंगणवाडी, शाळा खोल्या, योगा भवन व स्वच्छतागृहांच्या कामांना प्राधान्य । महिला व बालकांचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडविण्याच्या प्रशासनाला सूचना

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीची पहिली महासभा सभापती दिपालीताई बारस्कर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या महासभेत शहरातील महिला व बालकांच्या विविध प्रश्नांसह आरोग्य, शिक्षण, क्रीडा, महिला बचत गट, स्वच्छतागृह, अंगणवाडी, शाळा खोल्या, योगाभवन तसेच बचत गट भवन आदी विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार बजेटच्या ५ टक्के रक्कम म्हणजे २ कोटी ५५ लाख रुपयांच्या विकासकामांना मंजुरी देण्यात आल्याची माहिती सभापती दिपालीताई बारस्कर यांनी दिली.



महिला व बालकल्याण समितीसाठी बजेटच्या ५ टक्के रकमेची स्वतंत्र तरतूद करून दर महिन्याला स्वतंत्र खाते निर्माण करून त्यामध्ये रक्कम जमा करावी, असा निर्णयही महासभेत घेण्यात आला. या निधीतून महिला व बालकांसाठी आवश्यक असलेल्या विविध विकासकामांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

यावेळी उपसभापती वर्षा सानप, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, नगरसचिव मेहेर लहारे, उपायुक्त शाहनवाज तडवी, सदस्य पुष्पा बोरुडे, अश्विनी लोंढे, अनिता शेटीया, रोशनी त्रिंबके, रूपाली दातरंगे, शेख शहनाज, ▪ पान ४ वर


**कोणत्याही प्रकारचे कर्ज आता त्वरीत मिळवा!**

गरजेला नक्कीच मदत आमची, उभे राहण्याची हिंमत तुमची !

**राघव लोन सर्व्हिसेस**

व्यावसायिक कर्ज 75 लाखांपर्यंत (विनातारण)

सर्व प्रकारच्या कर्ज सुविधा

▪ जलद मंजुरी ▪ कमी व्याजदर ▪ सुलभ हफ्ते

जुन्या जेसीबी,ट्रॅक्टर, हायवा,कार, इ. साठीही कर्ज पुरवठा



**विनातारण कर्ज**
- व्यवसायीक व पगारदारांसाठी खास सी.सी / ओ.डी सुविधा
- डॉक्टर लोन
- आकर्षक व्याजदर



**तारण कर्ज**
- घर,एन.ए प्लॉट,व्यवसायिक मालमत्ता यासाठी कर्ज सुविधा
- आर.झोन,गुंठेवारी,ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता यावरही त्वरीत कर्ज



**वाहन कर्ज**
- नविन व जुन्या कारसाठी कमीत कमी व्याजदरात त्वरीत कर्ज
- व्यावसायिक वाहनांसाठी शासकीय अनुदान

विनातारण व्यावसायिक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे : ▸ पॅन कार्ड ▸ आधार कार्ड ▸ शॉप ॲक्ट ▸ उद्यम आधार ▸ मागील तीन वर्षांचे आयटीआर ▸ बँक अकाऊंट स्टेटमेंट (पीडीएफ मध्ये) ▸ जीएसटी सर्टिफिकेट ▸ लाईट बिल ▸ फोटो

सर्व प्रकारच्या व्यवसायासाठी शासकीय कर्ज योजनांचे ऑनलाईन फॉर्म भरुन मिळतील तसेच कर्जासाठी योग्य मार्गदर्शन केले जाईल

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ | मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम | ओ.बी.सी. महामंडळ योजना

(टीप - या योजनांसाठी सेवाशुल्क आकारले जाईल)

नियम व अटी लागू

700+ सिबिल स्कोअर 700+ असल्यास प्राधान्य

कोणतेही चालू कर्ज थकीत नसावे

आम्ही संपूर्ण महाराष्ट्रात कर्ज सेवा देतो

नामांकीत बँका व एनबीएफसी चे अर्थसहाय्य उपलब्ध !

**अधिक माहितीसाठी संपर्क : 9960283285**

पत्ता : शॉप नंबर 29,स्टेट बँके समोर,सुरजनगर,शिरुर,ता.शिरुर

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरमध्ये रविवारी विविध क्षेत्रातील गुणवंतांचा गौरव सोहळ्याचे आयोजन

अहिल्यानगर - चर्मकार विकास संघ अहिल्यानगर, रविदासिया फाउंडेशन मुंबई व लोकनेते मा. आमदार सितारामजी घनदाट (मामा) सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील चर्मकार समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत, आदर्श शिक्षक व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा रविवारी (दि. ६ सप्टेंबर) आयोजित करण्यात आला आहे. या गुणगौरव सोहळ्यात रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे.आमदार संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमात खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या हस्ते गुणगौरव सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमास आमदार काशिनाथ दाते, संदीपदादा घनदाट, ज्येष्ठ साहित्यिक संजय कळमकर, तुकाराम शेंडे, चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर, प्रा. सुभाष चिंधे, सुभाष मराठे, ज्ञानदेव पांडुळे, नगरसेवक सुरेश बनसोडे, डॉ. सागर बोरुडे, सुनिल त्र्यंबके, मयुर बांगरे आदी उपस्थित राहणार आहेत. या गुणगौरव सोहळ्याच्या माध्यमातून जिल्ह्यातील चर्मकार समाज एकवटणार आहे. सकाळी १० वाजता शहरातील टिळक रोडवरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे हा सोहळा होणार असून, यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन गुणगौरव समितीचे संतोष कानडे, सुरेश शेवाळे, सुभाष सोनवणे, अरुण गाडेकर, विनोद कांबळे व रुपेश लोखंडे यांनी केले आहे.
गुणगौरव सोहळ्याचे हे पंधरावे वर्ष आहे. या कार्यक्रमात इयत्ता १० वी व १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी, पदवीधर, अभियंते, डॉक्टर, प्रशासकीय अधिकारी, एमपीएससी-यूपीएससी व इतर स्पर्धा परीक्षेत यश मिळवलेले विद्यार्थी, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे युवक-युवती तसेच आदर्श शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे.

### अपघातातील नुकसानभरपाईसाठी मुळा पाटबंधारे कार्यालयासमोर आमरण उपोषण




अहिल्यानगर - मुळा पाटबंधारे विभागात कार्यरत असलेले आकाश ठोंबरे यांच्या वाहनाच्या धडकेत आपला उजवा पाय मोडल्याचा आरोप करीत विलास कराळे पाटील यांनी नुकसानभरपाईच्या मागणीसाठी मुळा पाटबंधारे कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे.
अपघातानंतर उपचाराचा खर्च देण्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र आता नुकसानभरपाई देण्यास टाळाटाळ होत असल्याचा दावा कराळे पाटील यांनी केला आहे. कराळे पाटील यांच्या म्हणण्यानुसार, ते भिस्तबाग चौकाकडे जात असताना आकाश ठोंबरे यांच्या वाहनाने पाठीमागून धडक दिली. या अपघातात त्यांच्या उजव्या पायाला गंभीर दुखापत होऊन पाय मोडला. त्यानंतर त्यांना पाईपलाईन परिसरातील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी त्यांना सावेडी येथील डवले हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तेथे त्यांच्या पायावर शस्त्रक्रिया करण्यात आली. या उपचाराचा खर्च ठोंबरे यांच्या वडिलांनी केला असल्याचे कराळे पाटील यांनी सांगितले. दरम्यान, पायामध्ये बसविण्यात आलेली सळई व स्क्रू पुढील काळात काढण्याची गरज असून, मधुमेहामुळे उपचाराला विलंब झाल्याचेही त्यांनी सांगितले. पुढील उपचारांचा खर्च तसेच नुकसानभरपाई देण्याचे आश्वासन ठोंबरे यांच्या वडिलांनी दिले होते. त्यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा आकाश ठोंबरे यांनीही एक ते दीड महिन्यात नुकसानभरपाई देण्याचे आश्वासन दिल्याचा दावा कराळे पाटील यांनी केला आहे. मात्र, आता नुकसानभरपाई देण्यास नकार दिला जात असून, मागणी करण्यासाठी गेल्यानंतर घरातील महिलांना पुढे करून खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली जात असल्याचा आरोपही कराळे पाटील यांनी केला आहे.आपल्याला झालेल्या शारीरिक, मानसिक व आर्थिक नुकसानीची भरपाई तातडीने देण्यात यावी, तसेच संबंधितांकडून दिलेला शब्द पाळण्यात यावा, या मागणीसाठी कराळे पाटील यांनी मुळा पाटबंधारे कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन योग्य ती चौकशी करून न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# धर्मवीर गडावरील छत्रपती संभाजी महाराज स्मारकासाठी ५ कोटींचा निधी मंजूर

**पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश; ऐतिहासिक धर्मवीर गडाच्या संवर्धनाला मिळणार गती**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**श्रीगोंदा–** श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव येथील ऐतिहासिक धर्मवीर गडावर छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकासाठी तसेच गडाच्या जतन व दुरुस्तीच्या कामांसाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने यासंदर्भात प्रशासकीय मान्यता दिली असून, त्यामुळे धर्मवीर गडाच्या संवर्धनाच्या कामाला आता प्रत्यक्ष गती मिळणार आहे.




राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील आणि श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी धर्मवीर गडाच्या विकासासाठी सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा केला. गडाचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन त्याचे संवर्धन, जतन आणि विकास व्हावा, तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतींना साजेसे स्मारक उभारले जावे, यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांना अखेर यश आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने १२ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या कार्यालयीन आदेशानुसार जिल्हा नियोजन समिती, नाशिक अंतर्गत प्राचीन स्मारकांच्या जतन व दुरुस्तीच्या कामांसाठी उपलब्ध निधीतून धर्मवीर गड, पेडगाव येथील कामाचा समावेश करण्यात आला आहे. संबंधित कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कामाला सुरुवात होणार आहे.

धर्मवीर गड हा छत्रपती संभाजी महाराजांच्या इतिहासाशी अतूट नाते सांगणारा ऐतिहासिक वारसा आहे. संगमेश्वर येथे पकडल्यानंतर छत्रपती संभाजी महाराजांना पेडगावच्या या गडावर आणण्यात आले होते. त्यामुळे त्यांच्या शौर्य, स्वाभिमान आणि बलिदानाच्या स्मृतींशी जोडलेल्या या भूमीचे जतन करणे ही ऐतिहासिक जबाबदारी आहे. धर्मवीर गडाच्या विकासासाठी मोठ्या आराखड्याच्या दिशेनेही प्रयत्न सुरू असून, गडाला ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न आहे.

**ऐतिहासिक वारसा जपण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल**

धर्मवीर गडाच्या जतन-दुरुस्तीमुळे गडावरील ऐतिहासिक वास्तूंचे संवर्धन होण्यास मदत होणार आहे. तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतींना उजाळा देणाऱ्या स्मारकाच्या उभारणीच्या दृष्टीनेही हा निधी महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या पाठपुराव्यामुळे मिळालेला ५ कोटींचा निधी हा धर्मवीर गडाच्या संवर्धनाच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि बलिदानाची साक्ष देणाऱ्या या ऐतिहासिक भूमीचे वैभव पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार आहे. धर्मवीर गडाचा ऐतिहासिक वारसा जपला जाणार असून, छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतींना साजेसे भव्य स्मारक उभारण्याच्या प्रयत्नांना आता नवी दिशा मिळाली आहे.

# शेतकऱ्यांनो घाबरू नका पाऊस येणारच – महंत रामगीरी महाराज

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**खरवंडी कासार–** शेतकऱ्यांनो संयम धरा घाबरू नका पाऊस येणारच मि भोलेनाथाला साकडे घातल आहे आपण संतभगवानबाबा वामनभाऊ महाराज भिमसिंह महाराज नामदेवशास्त्री महाराज यांच्या सानिध्यातील आहोत संताची कृपा आपल्यावर झाल्या शिवाय राहणार नाही वरुण राजा येणारच काळजी करू नका असे मत येळेश्वर संस्थान महंत हभप रामगीरी महाराज यांनी व्यक्त केले ते खरवंडी कासार येथे त्रितीनी महिलांचा अखंड हरिनाम सप्ताह शिवलीला अमृत ग्रंथ पारायण सोहळा व श्री संत भगवानबाबा जयंती महोत्सव प्रसंगी सप्ताह सांगता प्रसंगी किर्तण सेवेत बोलत होते.

श्री क्षेत्र भगवानगडाचे महंत डॉनामदेवशास्त्री यांच्या मार्ग दर्शनाखाली सालाबाद प्रमाणे आयोजित करण्यात आला होता किशोर महाराज शास्त्री तुळशीदास शास्त्री यांची दोन दिवसीय किर्तन सेवा संपन्न झाली तर सप्ताहाची सांगता महंत रामगीरी महाराज यांच्या अमृत वानीने झाली शिवलीला अमृत ग्रंथ पारायण मध्ये ११० महिलांनी सहभाग घेतला सदर नियोजन खेडकर बाईनी केले होते. सप्ताह सांगता किर्तणसेवा सुरु करण्यापुर्वी महंत रामगीरी यांनी खरवंडी कासार भोलेश्वराचे दर्शन घेत वरुण राजाला मनोभावे आर्त हाक दिली बरसरेराजा आता तरी बळीराजा संकटात आहे गुरेढोरे हंबरडा फोडत आहेत आणि मग किर्तणाला सुरवात केली किर्तनात सुद्धा भगवान बाबा वामभाऊ बाबा भिमसिंह बाबा यांना विनवी करतय किर्तण सेवा केली महाप्रसाद विद्या विजय टाकसाळे यांच्या वतीने देण्यात आला.

# बाभळीच्या झाडाला शर्टच्या साहाय्याने गळफास

**२२ वर्षीय युवकाचा मृतदेह । आत्महत्या की घातपात – घटनास्थळावरील वस्तूंमुळे संशय**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**शेवगाव–** अखेगाव रस्त्यावरील हॉटेल रिलॅक्स इनसमोर बाभळीच्या झाडाला शर्टच्या साहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत २२ वर्षीय युवकाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. प्रमोद भाऊराव ठुबे (वय २२, रा. लोळेगाव, ता. शेवगाव) असे मृत युवकाचे नाव आहे. दरम्यान, घटनास्थळी दारूच्या रिकाम्या बाटल्या, युवकाचे बूट तसेच विषाची बाटली आढळून आल्याचे सांगण्यात येत असल्याने हा प्रकार आत्महत्या आहे की घातपात, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे.

मंगळवार (ता. १) रोजी सकाळी अखेगाव रस्त्यावर फिरण्यासाठी गेलेल्या काही नागरिकांना हॉटेल रिलॅक्स इनसमोर बाभळीच्या झाडाला युवकाचा मृतदेह लटकलेल्या अवस्थेत दिसून आला. ही बाब लक्षात येताच नागरिकांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शेवगाव ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय तपासणी व शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. घटनास्थळी दारूच्या रिकाम्या बाटल्या, मृत युवकाचे बूट व विषाची बाटली आढळून आले. युवकाचा मृतदेह बाभळीच्या झाडाला शर्टच्या साहाय्याने लटकलेल्या अवस्थेत आढळल्याने या घटनेबाबत परिसरात विविध चर्चा सुरू आहेत. घटनास्थळी आढळलेल्या वस्तूंचा मृत्यूशी नेमका काय संबंध आहे, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. प्रमोदच्या मृत्यूमागे नेमके कारण काय आहे, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही. घटनेपूर्वी प्रमोदसोबत आणखी कोणी व्यक्ती होती का, तो घटनास्थळी कसा पोहोचला, तसेच घटनास्थळी आढळलेल्या वस्तू तेथे कशा आल्या, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे हा प्रकार आत्महत्या आहे की घातपात, याबाबतचा निष्कर्ष शवविच्छेदन अहवाल आणि पोलिस तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. प्रमोद ठुबे हा लोळेगाव येथील रहिवासी असून, तो आपल्या वडिलांसमवेत आठवडे बाजारात भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करत होता. तरुण मुलाच्या मृत्यूची बातमी समजताच कुटुंबीय, नातेवाईक व मित्रपरिवाराने शेवगाव ग्रामीण रुग्णालयात धाव घेतली. या घटनेमुळे ठुबे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. प्रमोदच्या पश्चात आई, वडील, एक बहीण व चुलते असा परिवार आहे. दरम्यान, पोलिसांनी या घटनेची अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पोलिस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. घटनास्थळावरील पुरावे, पंचनामा, शवविच्छेदन अहवाल तसेच इतर बाबींच्या तपासातून प्रमोदच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल.

# महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद व मुख्याध्यापक संघाच्या वतीने शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांचा सत्कार

**राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल गौरव**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रीय शैक्षिक योजना,दिल्ली यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती संध्या गायकवाड यांचा महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद,अहिल्यानगर महानगर तसेच अहिल्यानगर मुख्याध्यापक संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी केलेले प्रयत्न तसेच प्रशासनाच्या माध्यमातून शिक्षण व्यवस्थेला दिलेल्या योगदानाची दखल घेत श्रीमती गायकवाड यांची राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड झाली आहे.त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शिक्षक,मुख्याध्यापक व शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.



यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच अहिल्यानगर मुख्याध्यापक संघाच्या प्रतिनिधींनी शिक्षणाधिकारी श्रीमती गायकवाड यांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.याप्रसंगी अहिल्यानगर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे शहर जिल्हाध्यक्ष प्रसाद सामलेटी, शहर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष ज्ञानदेव बेरड,दादा चौधरी शाळेचे मुख्याध्यापक अशोक डोळसे,राष्ट्रीय पाठशाळेचे मुख्याध्यापक बोडखे,प्राचार्य शुभम टेमकर,साजिद पठाण, तौसिफ पठाण,नाना देवतरसे,शिदोरे सर,महिला आघाडीच्या सौ. कोकाटे मॅडम,प्राथमिक संघटनेचे श्रीराम खाडे, तुकाराम तनपुरे आदी उपस्थित होते.

शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची राष्ट्रीय स्तरावर झालेली दखल ही अहिल्यानगर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

# अहिल्यानगरच्या मॅक्सिमस स्पोर्ट्स ॲकॅडमीची विधी सैनी देशात अव्वल

**राष्ट्रीय व राज्य बॅडमिंटन स्पर्धांमध्ये सुवर्णपदकांची लयलूट**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** अहिल्यानगरच्या मॅक्सिमस स्पोर्ट्स ॲकॅडमीमध्ये २०१८ पासून बॅडमिंटनचे धडे गिरवणाऱ्या १४ वर्षीय विधी सैनी हिने आपल्या अष्टपैलू खेळाच्या जोरावर क्रीडा जगतात नवा इतिहास रचला आहे. विधीने नुकतीच भारतीय बॅडमिंटन संघात १५ वर्षांखालील मुलींच्या दुहेरी गटात देशात प्रथम क्रमांक पटकावून अहिल्यानगरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तिच्या या दैदिप्यमान कामगिरीमुळे संपूर्ण जिल्ह्यातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.
विधी सैनी ही ऑल इंडिया रँकिंगमध्ये १५ वर्षांखालील मुलींच्या दुहेरी गटात सध्या प्रथम क्रमांकावर विराजमान आहे. अहिल्यानगरमध्ये २०२५ मध्ये झालेल्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेत घरच्या मैदानावर तिने अप्रतिम खेळ करत सुवर्णपदकावर नाव कोरले होते. छत्रपती संभाजीनगरमध्ये याच वर्षी झालेल्या राज्य निवड चाचणी स्पर्धेत तिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. २०२४ मध्ये दिल्लीत झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत तिने राज्याचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक मिळवले होते. मध्यप्रदेशात २०२५ मध्ये झालेल्या शालेय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत तिने सलग दुसऱ्या वर्षी सुवर्णपदक जिंकून आपले वर्चस्व सिद्ध केले. यंदाच्या वर्षी हैदराबाद, बंगळुरू व जयपूरमध्ये झालेल्या सलग राष्ट्रीय रँकिंग स्पर्धांत कांस्यपदक मिळवून आपली सातत्यपूर्ण कामगिरी कायम ठेवली.
मॅक्सिमस स्पोर्ट्स ॲकॅडमीमध्ये गेल्या ८ वर्षांपासून घेतलेले कठोर प्रशिक्षण आणि प्रशिक्षक रोहित शर्मा यांचे योग्य मार्गदर्शन यामुळेच विधीने हे यश संपादन केले आहे. शिस्तबद्ध सराव, सातत्यपूर्ण प्रशिक्षण आणि स्पर्धात्मक वातावरणामुळे विधीने आपल्या खेळात सातत्याने प्रगती साधली आहे.
अहिल्यानगरमध्ये बॅडमिंटन खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षक आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणारी मॅक्सिमस स्पोर्ट्स ॲकॅडमी ही एकमेव अकॅडमी आहे. सध्या अकॅडमीमध्ये अनेक खेळाडू नियमितपणे प्रशिक्षण घेत असून, त्यांना राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील स्पर्धांसाठी आवश्यक असलेले शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिले जाते.

# शिक्षकाने सेवापूर्तीनंतर आरोग्य सांभाळून कुटुंबासोबत समाजाची सेवा करावी – बापूसाहेब डोके

**लक्ष्मीबाई शांताराम डोके विद्यालयाच्या शिक्षिका मंजुळा नवगिरे यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव । विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या शैक्षणिक सेवेचा सन्मान**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांना ज्ञान देणारा घटक नसून समाजाची भावी पिढी घडविण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडणारा घटक आहे. सेवाकाळात विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी प्रामाणिकपणे योगदान देणाऱ्या शिक्षकांनी सेवापूर्तीनंतरही आपला प्रदीर्घ अनुभव समाजाच्या उपयोगी आणावा. सेवापूर्ती म्हणजे कार्याचा शेवट नसून जीवनाच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे. त्यामुळे आता स्वतःच्या आरोग्याची काळजी घेत कुटुंबासोबत आनंदी जीवन जगावे आणि अनुभवाच्या माध्यमातून समाजसेवेत योगदान द्यावे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस बापूसाहेब डोके यांनी केले.

निर्मलनगर येथील लक्ष्मीबाई शांताराम डोके विद्यालयाच्या शिक्षिका सौ. मंजुळा नवगिरे यांच्या सेवापूर्ती समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेचा गौरव करून त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात बापूसाहेब डोके बोलत होते.



यावेळी संस्थेच्या सचिव आशादेवी डोके, संचालक महेश डोके, प्रमुख पाहुण्या आकाशा त्र्यंबके यांच्यासह विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी सौ. मंजुळा नवगिरे यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करून त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

बापूसाहेब डोके म्हणाले की, शिक्षकांचे कार्य हे समाजाच्या भवितव्याशी जोडलेले असते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात आणि त्यांना योग्य दिशा देण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. सेवाकाळात शिक्षक आपल्या ज्ञान, अनुभव आणि संस्कारांच्या माध्यमातून असंख्य विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी विद्यालयातील शिक्षकांनी आपल्या मनोगतातून मंजुळा नवगिरे यांच्या प्रदीर्घ सेवाकाळातील विविध आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थ्यांशी त्यांचे असलेले आत्मीय नाते, प्रेमळ आणि आपुलकीचा स्वभाव तसेच शैक्षणिक कार्याप्रती असलेली निष्ठा यांचा आवर्जून उल्लेख करण्यात आला.

मंजुळा नवगिरे यांच्या सेवापूर्ती समारंभासाठी त्यांच्या कुटुंबीयांनीही आवर्जून उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी सुनील क्षत्रे, सोनम, आशा धामणे, संजोग बर्वे, सुजाता कर्डीले, ज्योती पवार, राणी राऊत, अभिषेक खामकर, किरण जाधव, सॉलोमन क्षेत्रे, तन्मय, अर्पण आदींसह कुटुंबीय उपस्थित होते. उपस्थितांनी नवगिरे यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, आनंद आणि समाधानाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाचे अध्यक्ष व सचिव यांच्या हस्ते सौ. मंजुळा नवगिरे यांचा विशेष सत्कार करून त्यांना सन्मानित करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनीही त्यांचे स्वागत व सत्कार करून त्यांच्या शैक्षणिक योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्रदीर्घ काळ विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या शिक्षिकेच्या सेवेला या कार्यक्रमाद्वारे सलाम करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंदाकिनी पांडुळे यांनी केले. उपस्थितांचे आभार रिबेका क्षेत्रे यांनी मानले.


**CHANGEING IN NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME SITADEVI CHINTAMANI PANDEY (BOARD CERTIFIACTE) (BEFORE NAME) TO NEW NAME AS SITA CHINTAMANI PANDEY (AADHAR NO. 2139 4798 3802) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHIRDI PLACE: SHIRDI DATE: 02/09/2026



आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत यशश्री मगरची चमकदार कामगिरी



अहिल्यानगर - प्रतिनिधी पुणे येथे ऑगस्ट २०२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत अहिल्यानगरच्या कु. यशश्री सचिन मगर हिने उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम श्रेणी क्रमांक पटकावला. वेग, अचूकता आणि उत्कृष्ट गणिती कौशल्याच्या जोरावर यशश्रीने ही मानाची कामगिरी केली असून, तिच्या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या स्पर्धेत यशश्री मगर हिने अवघ्या १० मिनिटांत तब्बल १९२ गणिते अचूकपणे सोडवून प्रथम श्रेणी क्रमांकाची चॅम्पियन ट्रॉफी मिळवली. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत इतक्या कमी वेळेत मोठ्या संख्येने गणिते अचूक सोडविणे ही तिच्या एकाग्रता, गणिती क्षमता आणि सातत्यपूर्ण सरावाची दखल घेणारी कामगिरी ठरली आहे. यशश्रीच्या या यशामागे तिच्या कुटुंबीयांचे प्रोत्साहन तसेच गॅलेक्सी संस्थेचे श्री. अमोल ढेपे सर आणि सौ. सोनाली ढेपे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली यशश्रीने नियमित सराव, वेळेचे नियोजन आणि अचूकतेवर विशेष भर देत स्पर्धेची तयारी केली. राष्ट्रीय स्तरावर मिळविलेल्या या यशामुळे यशश्रीने अहिल्यानगरच्या शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कौशल्याची विशेष छाप पाडली आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पालक, शिक्षक, मार्गदर्शक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून तिचे अभिनंदन करण्यात येत असून, भविष्यातही ती अशीच यशाची नवी शिखरे गाठेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने त्रयस्थ समितीमार्फत चौकशीची मागणी



अहिल्यानगर - पारनेर पंचायत समिती अंतर्गत मौजे जवळा, हत्तलखिंडी, विरोळी व देवीभोयरे ग्रामपंचायतीच्या हद्दीत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (एमआरजीएस) करण्यात आलेल्या विविध कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीने केला आहे. संबंधित कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची असून, अनेक कामे शासनाच्या नियमांनुसार व मंजूर प्लॅन-इस्टीमेटनुसार करण्यात आलेली नसल्याचा दावा समितीने केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची त्रयस्थ समितीमार्फत चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित ठेकेदाराची सर्व देयके थांबवावीत, अशी मागणी समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी केली आहे.या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाला देण्यात आले आहे. संबंधित प्रकरणी ठोस कारवाई न झाल्यास ८ सप्टेंबर रोजी नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. समितीने दिलेल्या निवेदनानुसार, जवळा, हत्तलखिंडी, विरोळी व देवीभोयरे ग्रामपंचायती अंतर्गत एमआरजीएसमधून झालेल्या कामांमध्ये रोजगार सेवक व ग्रामसेवक यांनी नियमांची पूर्तता न करता कामे दाखविल्याचा आरोप करण्यात आला आहे. मंजूर प्लॅन-इस्टीमेटनुसार प्रत्यक्ष काम न करता केवळ कागदोपत्री कामे पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आल्याचा दावा समितीने केला आहे.विशेषतः शिवपानंद रस्त्यांच्या कामांमध्येही शासनाच्या ६०:४० प्रमाणातील नियमांचे पालन झाले नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

# श्रीरामपूर शहरात मध्यरात्री सोमनाथ वाकचौरेंचा मोठा दणका

**थत्ते मैदान अन् पोद्दार शाळा परिसरातील मद्यपी, हुल्लडबाजांवर कारवाई; एसपींच्या आदेशाने ३२ जण जाळ्यात**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**श्रीरामपूर–** श्रीरामपूर शहरातील मोकळ्या मैदानांवर रात्रीच्या वेळी ठिय्या मांडून हुल्लडबाजी करणाऱ्या आणि मद्यप्राशन करून शांतता भंग करणाऱ्या टवाळखोरांवर पोलिसांनी अचानक धडक कारवाई केली. काल रात्री आठ ते दहा वाजेच्या सुमारास अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे , श्रीरामपूर पोलीस निरीक्षक आणि आरसीपी () पथकाने संयुक्तपणे राबवलेल्या या विशेष मोहिमेमुळे हुल्लडबाजांचे धाबे दणाणले आहेत. या कारवाईत मद्यपी, विनाकारण बसणारे तरुण आणि नियमबाह्य वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन () आणि अप्पर आधीक्षक पोलीस सोमनाथ वाकचौरे यांच्या धडक कृतीचे शहरातील नागरिकांकडून जोरदार स्वागत केले जात आहे.

**थत्ते मैदान आणि पोद्दार शाळा परिसरात धाड**

गेल्या काही दिवसांपासून श्रीरामपूर शहरातील थत्ते मैदान तसेच महाले पोद्दार शाळेसमोरील क्रिकेट मैदानावर रात्रीच्या वेळी टवाळखोर आणि हुल्लडबाज तरुणांचा वावर वाढला होता. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी काल रात्री अचानक संपूर्ण मैदानांना वेढा घालून तपासणी मोहीम हाती घेतली. या मोहिमेदरम्यान सुमारे ३२ वाहने आणि मद्यप्राशन करून धिंगाणा घालणाऱ्या व्यक्तींवर थेट दंडात्मक कारवाई करण्यात आली.

**गोंधवणीसह बाहेरच्या भागातील तरुणांचा भरणा**

तपासणीदरम्यान एक धक्कादायक बाब समोर आली असून, श्रीरामपूर शहरातील गोंधवणी परिसर तसेच इतर आउटसाईडर एरियामधून अनेक तरुण केवळ गप्पागोष्टी करण्यासाठी अथवा मद्यप्राशन करण्यासाठी या मैदानांवर एकत्र येत असल्याचे निदर्शनास आले. रात्रीच्या वेळी आपल्या कुटुंबासह किंवा महिलांसह परिसरात फिरण्यासाठी बाहेर पडणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना आणि स्थानिक रहिवाशांना या हुल्लडबाजांचा मोठा त्रास सहन करावा लागत होता.

काळ्या काचांच्या गाड्यांवरही पोलीस गाज याच मोहिमेदरम्यान थत्ते मैदानावर संशयास्पदरित्या उभ्या असलेल्या दोन फोर-व्हीलर वाहनांवर पोलिसांनी कारवाई केली. या दोन्ही गाड्यांच्या काचांना पूर्णपणे ब्लॅक फिल्म (काळ्या काचा) लावण्यात आल्याचे आढळून आल्याने त्यांच्यावर तत्काळ नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली.

**नागरिकांकडून एसपी अन् पोलिसांचे कौतुक**

स्थानिक नागरिकांच्या वाढत्या तक्रारींची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक () यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी स्वतः पुढाकार घेऊन ही धडक मोहीम राबवली. या धाडसी कारवाईमुळे परिसरातील रहिवाशांनी सुटकेचा निःश्वास सोडला असून पोलीस प्रशासनाचे कौतुक केले आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आणि महिला व कुटुंबांच्या सुरक्षेसाठी अशी कारवाई पुढेही सातत्याने सुरू ठेवावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, शहरातील मैदानांवर किंवा सार्वजनिक ठिकाणी विनाकारण बसणाऱ्या, मद्यप्राशन करणाऱ्या आणि नियम मोडणाऱ्यांवर यापुढेही अशीच कठोर आणि सतत कारवाई सुरू राहील.

# भाळवणीत हरिनामाच्या गजरात ४२ व्या सप्ताहाची भक्तिमय सांगता

**पद्मश्री पोपटराव पवार, आमदार काशिनाथ दाते यांची उपस्थिती; हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**भाळवणी–** श्री क्षेत्र भाळवणी (ता. पारनेर) येथे सालाबादप्रमाणे श्रावण मासानिमित्त चक्रवर्ती विश्वसम्राट श्री भगवान नागेश्वराच्या ४२ व्या अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण आणि संगीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याची सोमवारी (दि. ३१) अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि टाळ-मृदंगाच्या गजरात सांगता झाली.

ह.भ.प. भागवताचार्य मनोहर महाराज सिनारे (राहुरी) यांच्या काल्याच्या कीर्तनाने या सप्ताहाची सांगता.या सोहळ्यास पारनेर नगर विधानसभेचे आमदार काशिनाथ दाते, पद्मश्री पोपटराव पवार, पारनेरतालुका दूध संघाचे अध्यक्ष संदीप ठुबे, खरेदी-विक्री संघाचे संचालक गंगाधर रोहोकले, उपसरपंच आप्पादादा रोहोकले, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष संदीप रोहोकले, मंजाबापू चेमटे, ज्ञानदेव रोहोकले,बाबुराव रोहोकले आणि संदीप कपाळे यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

सप्ताहभर चाललेल्या या धार्मिक सोहळ्यात दररोज ज्ञानेश्वरी पारायण, संगीत श्रीमद् भागवत कथा, हरिपाठ व रात्री विविध नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा पार पडली.

> आजच्या आधुनिक युगात तरुनांचा या सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभाग केवळ उपस्थितीपुरता मर्यादित नसून संस्कृती, परंपरा आणि नैतिक मूल्यांशी स्वतःला जोडून घेण्याचा एक सकारात्मक प्रयत्न आहे.हरिनाम सप्ताहासारखे धार्मिक सोहळे केवळ अध्यात्मापुरते मर्यादित नाहीत, तर त्यातून जाती-पातीचे भेद विसरून गावात सामाजिक सलोख्याचे वातावरण तयार होते. भजन, कीर्तन आणि हरिनाम जपामुळे मनाला एकाग्रता आणि खरी शांती मिळते.लहान मुलांवर आणि नवतरुणांवर उत्तम संस्कार घडतात. कीर्तन आणि भजनाच्या माध्यमातून समाजातील अनिष्ट रुढी-परंपरांवर प्रहार केला जातो. व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि जलसंधारण यांसारख्या विषयांवर प्रबोधन मिळते.ग्रामस्थ एकत्र येतात, तेव्हा गावातील शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी एकत्र काम करण्याची प्रेरणा मिळते.
>
> -पोपटराव पवार
> (मा. सरपंच आदर्शगावं हिवरे बाजार)

भाळवणीसह परिसरातील हजारो भाविक भक्तांनी या सोहळ्याचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. ज्येष्ठ मंडळींचे मार्गदर्शन, सप्ताह समितीचे नियोजन आणि भाळवणी ग्रामस्थांचे विशेष सहकार्य यांमुळे हा सोहळा अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साहात पार पडल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# माथणी शाळेतील विद्यार्थ्यांनी सैनिकांसाठी पाठवल्या राख्या



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त देशाचे अहोरात्र रक्षण करणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सैनिकांना राख्या पाठवल्या आहेत .एक राखी देशसेवेसाठी हा उपक्रम शाळेत घेण्यात आला. आपल्या कुटुंबापासून दूर राहून रात्रंदिवस देश रक्षण करणाऱ्या जवानांना या पवित्र सणाचा आनंद मिळावा तसेच विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना निर्माण व्हावी या उद्देशाने विद्यार्थ्यांनी स्वतः अनेक राख्या तयार केल्या.

पहिली राखी त्या हाताला बांधूया जो बहिणीच्या रक्षणासाठी देशाचे रक्षण करतो. या प्रेरणेने विद्यार्थ्यांनी या उपक्रमात कृतीशील सहभाग घेतला. या विद्यार्थ्यांना शाळेतील उपक्रम शिक्षक श्री. सुनील अडसूळ व श्री. राहुल व्यवहारे यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी भारतीय टपाल विभागाने जवानांना राख्या पाठवण्यासाठी मदत केली. या राख्या जवानांना पोस्टाद्वारे पाठवण्यात आल्या. तसेच शाळेत सैनिकांना निमंत्रित करून त्यांना राख्या बांधण्यात आल्या. यावेळी सैनिकांनी विद्यार्थ्यांना देशभक्ती बाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. सुधीर घोरपडे, शिक्षक सुनील अडसूळ व राहुल व्यवहारे यांनी जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी पालक विवेक घोरपडे उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पैठणच्या कार्यकर्त्यांचा प्रवेश

**प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत मुंबईत पक्षप्रवेश; आगामी राजकीय समीकरणांबाबत चर्चेला उधाण**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे पैठण शहरातील विविध कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. किशोर तावरे, एकनाथ जाधव, ऋषी चौधरी, किशोर लाड, वैभव सिरवत, नंदकिशोर बाबर, शंकर जाधव, शिवप्रसाद कोळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी पक्षाचे घड्याळ हाती घेतले.

मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश सोहळ्याला प्रदेश सरचिटणीस दिलीप बनकर, महेश उबाळे, पैठण विधानसभा अध्यक्ष विनोद तांबे, तालुकाध्यक्ष विलास शेळके, पंकज ठोंबरे, ज्ञानेश्वर कापसे, अनिल हजारे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी नव्याने पक्षात प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे पक्षाच्या वतीने स्वागत करण्यात आले. पैठण तालुक्यात




राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी आगामी काळात विविध उपक्रम व कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

पैठणमधील सक्रिय कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने स्थानिक पातळीवर पक्षाची ताकद वाढण्यास मदत होणार आहे. विशेषतः आगामी काळातील राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या पक्षप्रवेशाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले असून, पैठणच्या राजकारणातील समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कार्यकर्त्यांच्या पक्षप्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक संघटनेला नवे बळ मिळाले असून, येत्या काळात आणखी काही कार्यकर्ते पक्षात प्रवेश करणार का, याकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# मतमाऊली हरेगाव यात्रेसाठी अहिल्यानगरमधून १० सप्टेंबरला पदयात्रा

**हजारो भाविकांच्या सहभागाने बोल्हेगावातून होणार प्रस्थान; १२ व १३ सप्टेंबरला हरेगाव येथे यात्रा उत्साहात**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सालाबादप्रमाणे यंदाही मतमाऊली हरेगाव यात्रेनिमित्त अहिल्यानगर शहरातून मोठ्या संख्येने भाविक पदयात्रेने हरेगाव (ता. श्रीरामपूर) येथे जाणार आहेत. गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजता बोल्हेगाव येथून या भव्य पदयात्रेचे प्रस्थान होणार असून, शुक्रवार दि. ११ सप्टेंबर रोजी राहुरी येथून श्रीरामपूरच्या दिशेने पदयात्रा पुढे मार्गस्थ होणार आहे. शनिवार दि. १२ सप्टेंबर रोजी हरेगाव वेस ते चर्च अशी मिरवणूक काढण्यात येणार आहे. दि. १२ व १३ सप्टेंबर रोजी मतमाऊली यात्रा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडणार असल्याची माहिती पद यात्रेचे प्रमुख प्रा. पंकज लोखंडे यांनी दिली.



ख्रिस्ती धर्मगुरू येशू संधिय, डायसेस, रेव्ह. आबा वाघमारे, रेव्ह. प्रकाश राऊत, रेव्ह. संपत भोसले यांच्या आशीर्वादाने मतमाऊली पदयात्रा कमिटीच्या वतीने या यात्रेला प्रारंभ होणार आहे. श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक एकतेचा संदेश देणाऱ्या या पदयात्रेत अहिल्यानगर शहरासह परिसरातील मोठ्या संख्येने ख्रिस्ती समाजबांधवांसह इतर समाजबांधव देखील सहभागी होणार आहे. ही पदयात्रा आमदार संग्राम जगताप, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, नगरसेवक सुरेश बनसोडे, माजी पोलिस निरिक्षक सुहासकुमार देठे, पा. प्रशांत चक्रनारायण, पा. अनिल कसबे, कार्यवाहक अभिमन्यु साळवे व राजेश फुलपगार, यात्रा कमिटीचे अध्यक्ष जॉन्सन लोखंडे, उपाध्यक्ष विशाल गायकवाड, सचिव राजू डोईफोडे, सहसचिव बाळासाहेब पाटोळे, कार्याध्यक्ष अमित लोखंडे, सहकार्याध्यक्ष निलेश साळवे, संघटक सनी भाकरे, सदस्य शरद वाकडे, अनिल डोईफोडे, जुबेर सय्यद, महादेव माने यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली आहे. पदयात्रेचे संपूर्ण नियोजन प्रा. पंकज लोखंडे पाहत आहेत.

पदयात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी नितिन साठे, सूदाम साळवे, मयूर साळवे, निलेश चक्रनारायण, प्रफुल्ल लोखंडे, प्रेशित चक्रनारायण, गौरव वाकडे, जॉकीन गायकवाड, राजेंद्र भोसले, दिलशाद अन्सारी, मंगेश घोडेकर, संतोष वाघ, जावेद सय्यद, शुभम डोईफोडे, तैमूर सय्यद आदी परिश्रम घेत आहेत.

महिला कमिटीच्या माध्यमातूनही पदयात्रेच्या नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावली जात आहे. महिला कमिटीच्या अध्यक्ष सौ. प्राजक्ता लोखंडे, सचिव कविता डोईफोडे, उपाध्यक्ष रिटा घोडेकर, क्लेरा लोखंडे तसेच पा. लता कसबे, प्रियंका साळवे, जयश्री गायकवाड, ज्योती साठे, अनिता लोखंडे, पूजा डोईफोडे, प्रांजली लोखंडे, शुभांगी डोईफोडे, शारदा गायकवाड, मनीषा चक्रनारायण, सारिका शिरसाठ, ईश्वरी चक्रनारायण, सारा गायकवाड, पुजा लोखंडे, सान्वी लोखंडे, साईश घोडेकर, निलोफर सय्यद, मुस्तफा सय्यद, आयान सय्यद आदी नियोजनात सक्रिय आहेत. स्व मधूकर खंडूजी लोखंडे (गुरुजी), प्रतिष्ठानचे राजेंद्र लोखंडे, रमेश लोखंडे, जॉर्ज लोखंडे, प्रशांत लोखंडे हे देखील पदयात्रेच्या यशस्वीतेसाठी काम पाहत आहेत.

# पैठणच्या शेतकऱ्यांना गतवर्षीची नुकसानभरपाई द्या!

**डॉ. सुनील शिंदे यांची मुख्यमंत्री फडणवीसांकडे मागणी**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** गतवर्षी अतिवृष्टीमुळे पैठण तालुक्यातील शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शासनाकडून पंचनामे करूनही नुकसानभरपाईचे अनुदान अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झालेले नाही. त्यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) विधानसभा संघटक तथा माजी जिल्हा परिषद सभापती डॉ. सुनील शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गतवर्षीच्या अतिवृष्टीमुळे खरीप पिकांसह विविध पिकांचे मोठे नुकसान झाले होते. प्रशासनाने नुकसानीचे पंचनामे करून अहवाल शासनाकडे सादर केला. मात्र, पंचनामे होऊनही नुकसानभरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झालेली नसल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. यंदाही निसर्गाच्या कोपामुळे शेतकऱ्यांना विविध संकटांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे गतवर्षीची प्रलंबित नुकसानभरपाई तातडीने वितरित करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी डॉ. शिंदे यांनी केली आहे.

सणासुदीचा काळ लक्षात घेता नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाची मदत तातडीने उपलब्ध करून द्यावी, तसेच शासनस्तरावर प्रभावी पाठपुरावा करून भरपाईचे अनुदान लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावे, अशी अपेक्षाही निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

# दर्शनासोबत विकासकामांचा प्रत्यक्ष आढावा
# डॉ. नीलम गोऱ्हे यांचा अष्टविनायक दौरा संपन्न

**२७ ते ३१ ऑगस्टदरम्यान आठही देवस्थानांना भेट; उपसभापती असताना दिलेल्या सूचनांच्या अंमलबजावणीची पाहणी । प्रत्येक देवस्थानाला वैयक्तिक रु. १२ हजारांची देणगी; लेण्याद्री व पालीतील प्रश्नांसाठी करणार पाठपुरावा**



**पुणे –** शिवसेना नेत्या तथा विधान परिषद सदस्या आणि माजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी २७ ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत अष्टविनायक दर्शन व विकासकामांचा पाहणी दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी मोरगावचा श्री मयूरेश्वर, सिद्धटेकचा श्री सिद्धिविनायक, पालीचा श्री बल्लाळेश्वर, महडचा श्री वरदविनायक, थेऊरचा श्री चिंतामणी, लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मज, ओझरचा श्री विघ्नेश्वर आणि रांजणगावचा श्री महागणपती यांचे दर्शन श्लोकातील क्रमाने घेतले. पुन्हा मोरगाव येथे दर्शन घेऊन यात्रेची सांगता करण्यात आली.

दौऱ्यात डॉ. गोऱ्हे यांनी प्रत्येक देवस्थानातील विश्वस्त आणि पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून मंदिर परिसरातील रस्ते, स्वच्छता, पिण्याचे पाणी, महिला स्वच्छतागृहे, पार्किंग, प्रकाशव्यवस्था, सुरक्षा आणि सुरू असलेल्या विकासकामांची माहिती घेतली. प्रत्येक देवस्थानाच्या धार्मिक व सामाजिक कार्यासाठी त्यांनी वैयक्तिकरित्या प्रत्येकी रु. १२ हजार, अशी एकूण रु. ९६ हजारांची देणगी दिली.

मागील दौऱ्याच्या तुलनेत अष्टविनायक देवस्थानांना जोडणारे बहुतांश रस्ते चांगले झाले असून प्रवास अधिक सुकर झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. मात्र, महिला भाविक, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या कुटुंबांसाठी प्रमुख मार्गांवर नियमित अंतराने स्वतंत्र आणि सुरक्षित महिला स्वच्छतागृहे उभारण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. या स्वच्छतागृहांमध्ये पाणी, वीज आणि नियमित स्वच्छतेची व्यवस्था करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. गोऱ्हे यांनी तत्कालीन विधान परिषद उपसभापती म्हणून ११ ते १३ डिसेंबर २०२१ या कालावधीत अष्टविनायक दौरा केला होता. त्यानंतर १० जानेवारी २०२२ रोजी घेतलेल्या ऑनलाइन आढावा बैठकीत विकासकामे कालमर्यादेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करणे, रस्त्यांची दुरुस्ती, दोन तासांच्या प्रवासाच्या अंतरावर सार्वजनिक स्वच्छतागृहे, शुद्ध पिण्याचे पाणी, दिशादर्शक फलक, स्वच्छता तसेच मंदिरांजवळील तलावांचे सुशोभीकरण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या होत्या. त्यानंतर जुलै २०२४ मध्येही डॉ. गोऱ्हे यांच्या दालनात अष्टविनायक देवस्थानांच्या प्रश्नांवर बैठक झाली होती. त्यामध्ये आपत्ती व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, पार्किंग, आरोग्य सुविधा, अंतर्गत रस्ते, दळणवळण, मंदिरातील दागिने व मालमत्तेची सुरक्षा तसेच विकासकामांसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधी मिळविण्याबाबत त्यांनी निर्देश दिले होते. सध्याच्या दौऱ्यात या सूचनांच्या अंमलबजावणीचा प्रत्यक्ष मागोवा घेण्यात आला.

**लेण्याद्रीसाठी स्वतंत्र पाठपुरावा**

अष्टविनायक मंदिरांच्या जीर्णोद्धार आराखड्यात लेण्याद्रीच्या श्री गिरिजात्मज मंदिराचा समावेश झालेला नसल्याची बाब मंदिर समितीने डॉ. गोऱ्हे यांच्या निदर्शनास आणून दिली. मंदिर पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत असल्याने जीर्णोद्धारासाठी निधी नाकारण्यात आल्याचे समितीने सांगितले. मात्र, हा निर्णय घेताना मंदिर समितीला विश्वासात घेण्यात आले नसल्याची भावनाही पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

''ऐतिहासिक वास्तूचे मूळ स्वरूप आणि पुरातत्त्व विभागाचे नियम जपणे आवश्यक आहे. मात्र, मंदिर समितीला विश्वासात घेऊन भाविकांसाठी आवश्यक सुविधा निर्माण होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. संरक्षित मंदिराला धक्का न लावता पायथ्याचा परिसर, स्वच्छता, पिण्याचे पाणी, विश्रांतीची जागा, महिला स्वच्छतागृहे आणि परिसर सुशोभीकरणासाठी स्वतंत्र निधी मिळविण्याचा पाठपुरावा केला जाईल,'' असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

**पाली येथे तात्पुरत्या ताडपत्रीची वैयक्तिक व्यवस्था**

पाली परिसरात पावसाचे प्रमाण जास्त असल्यामुळे श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मंदिरात जाताना पावसात भिजावे लागते, ही अडचण देवस्थान समितीने मांडली. भाविकांची तातडीची गैरसोय दूर करण्यासाठी मंदिर समितीशी समन्वय साधून तात्पुरत्या स्वरूपात ताडपत्रीचे आच्छादन करण्याची व्यवस्था डॉ. गोऱ्हे वैयक्तिकरित्या करणार आहेत. या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजनेसाठी शासनाकडे स्वतंत्र प्रस्तावाचा पाठपुरावा केला जाईल. ओझर येथे मंदिराच्या अंतर्गत भागातील कामे पुरातत्त्व विभागाच्या सूचनांनुसार झाल्याचे दिसून आले.

# गोरेगावात संत सावता महाराज व संगमेश्वर मंदिर सभामंडपाचे भूमिपूजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** श्री संत सावता महाराज सभामंडप व श्री संगमेश्वर मंदिर सभामंडप बांधकामाचा भूमिपूजन समारंभ पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते उत्साहात संपन्न झाला. यावेळी बोलताना आमदार दाते सर यांनी गोरेगाव येथे यापूर्वी करण्यात आलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेतानाच मतदारसंघातील गावागावांत सुरू असलेल्या विकासकामांचा उल्लेख केला. गोरेश्वर देवस्थानच्या प्रस्तावित सभामंडप बांधकामास आगामी काळात ५० लक्ष तर गोरेगाव पारनेर रस्त्याच्या मजबुतीकरणासाठीही निधी उपलब्ध करून देणार असल्याचे सांगत विकास हा केवळ काही भागापुरता मर्यादित न ठेवता प्रत्येक गावाच्या गरजा आणि नागरिकांच्या मागण्यांनुसार कामे मार्गी लावण्याचा आपला प्रयत्न असल्याचेही आ. दाते म्हणाले. विशेषतः पारनेर व कान्हूर पठार मंडळातील शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या प्रश्नावर केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा उल्लेख करत, सन २०२५ मधील अतिवृष्टी व नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांसाठी नुकतीच सुमारे १३ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करून घेण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले. ''विकासकामे करताना गाव, गट किंवा व्यक्ती असा कोणताही भेद न ठेवता सर्वसामान्यांच्या गरजांना प्राधान्य देणे, हीच माझी भूमिका आहे. गोरेगावच्या विकासासाठी यापुढेही आवश्यक ती कामे मार्गी लावली जातील. शेतकरी, युवक, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी आपला पाठपुरावा सातत्याने सुरूच राहील,'' असे आमदार दाते सर यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी माजी जिल्हा परिषद सभापती बाबासाहेब तांबे, मा. जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, लोकनियुक्त सरपंच सौ. सुमन तांबे, माजी सरपंच राजाराम नरसाळे, मिराबाई नरसाळे, राष्ट्रवादी उपाध्यक्ष प्रितेश पानमंद, तंटामुक्ती अध्यक्ष पै. दादाभाऊ नरसाळे, ग्रापं सदस्य गणेश तांबे, सुरेश चौरे, बाबासाहेब चौरे, साहेबराव तांबे, भाऊसाहेब तांबे, भाऊ नरसाळे, योगेश नरसाळे, रामदास चौरे, बाबासाहेब नांगरे, ऋषीकेश नरसाळे, अनिल नरसाळे, वामन चौरे, दत्तोपंत नरसाळे, नवनाथ नरसाळे, बाळासाहेब नरसाळे मेजर, चिमभाऊ नरसाळे मेजर, भाऊ तांबे, भानुदास नरसाळे, ज्ञानदेव तांबे, बाळु नरसाळे, संतोष नरसाळे, अर्जुन चौरे, उत्तम चौरे, दत्तु चौरे, दादाभाऊ चौरे, ठेकेदार साहेबराव नरसाळे, सबाजी शेरकर, वैभव नरसाळे इ. मान्यवर उपस्थित होते.

**''गोरेगावच्या श्रद्धास्थानांच्या विकासासाठी आजचा दिवस निश्चितच आनंदाचा आणि अभिमानाचा आहे. श्री संत सावता महाराज व श्री संगमेश्वर मंदिर सभामंडपाच्या भूमिपूजनामुळे भाविकांसह ग्रामस्थांना मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे. गोरेश्वर देवस्थानच्या प्रस्तावित सभामंडप बांधकामासाठी यापूर्वी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी २० लक्ष रुपये निधी दिलेला असून आज आमदार काशिनाथ दाते सर यांनीही सबंधित कामासाठी ५० लक्ष निधी देण्याचे मान्य केले असून आवश्यक असणारा अधिकचा ५० लक्ष निधी उपलब्ध करण्यासाठी माझे प्रयत्न सुरु असून लवकरच त्या कामाचेही भुमिपूजन संपन्न होईल. ग्रामस्थांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत गोरेगावच्या विकासासाठी सबंधित कामे मार्गी लावल्याबद्दल व गोरेश्वर देवस्थान सभामंडपासह गोरेगाव पारनेर रस्त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी आश्वासित केल्याबद्दल आम्ही सर्व ग्रामस्थ आमदार साहेबांचे मन:पूर्वक आभार मानतो.**

**– बाबासाहेब तांबे,**
**माजी सभापती कृषी व पशुसंवर्धन, अहिल्यानगर**

# अहिल्यानगर जिल्हास्तरीय 'करिअर मॅपिंग एकदिवसीय कार्यशाळा' उत्साहात

**छत्रपती कॉलेजमध्ये जिल्ह्यातील समन्वयक व संसद विद्यार्थ्यांचा सहभाग**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी –** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे तसेच त्यांच्या आवडी, क्षमता, कौशल्ये आणि भविष्यातील संधींचा विचार करून त्यांना योग्य करिअरची दिशा मिळावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'अहिल्यानगर जिल्हास्तरीय करिअर मॅपिंग एकदिवसीय कार्यशाळेचे' आयोजन दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा येथे करण्यात आले. सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात या कार्यशाळेचा शुभारंभ झाला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्रीगोंदा तालुक्याचे युवा नेते मा. दिग्विजय राजेंद्रदादा नागवडे आणि विश्वस्त प्रा.सुरेश रसाळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य प्रवर्तक डॉ. सतीशचंद्रजी सूर्यवंशी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने झाली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे युवा नेते दिग्विजय राजेंद्रदादा नागवडे यांनी अचूक करिअर मॅपिंग, प्रामाणिक कष्ट आणि कामातील सातत्य या बळावरच तरुण वयात संघर्षावर मात करून यश मिळवता येते आणि तरुणांनी आपल्या ऊर्जे चा योग्य वापर करून ध्येयाकडे वाटचाल करावी, असे आवाहन केले.

प्राचार्य डॉ. सतीशचंद्रजी सूर्यवंशी यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी, क्षमता आणि कौशल्यांनुसार योग्य करिअरची निवड करता यावी तसेच भविष्यातील संधींचा प्रभावीपणे उपयोग करता यावा, यासाठी अशा कार्यशाळांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

उद्घाटन सत्राचे आभार समन्वयक डॉ.विजय इथापे यांनी मानले. सकाळी ११.३० ते दुपारी १.०० या वेळेत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. या सत्रात मा. यशवंत शितोळे, अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांनी विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधी, कौशल्य विकास, स्पर्धात्मक परीक्षांचे क्षेत्र तसेच भविष्यातील करिअर नियोजनाबाबत मार्गदर्शन केले. बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांनी आवश्यक कौशल्ये आत्मसात करून उपलब्ध संधींचा योग्य पद्धतीने उपयोग करावा, असे त्यांनी सांगितले. त्यानंतर दुपारी १.०० ते २.०० या वेळेत मा. भूषण कोळेकर, माजी सहाय्यक महाव्यवस्थापक (), स्टेट बँक ऑफ इंडिया यांचे मार्गदर्शनपर सत्र झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षा, बँकिंग क्षेत्र, व्यवसाय, रोजगाराच्या विविध संधी आणि करिअर नियोजन याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक पात्रतेसोबत आवश्यक कौशल्ये विकसित करून भविष्यातील संधींसाठी स्वतःला तयार करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दुपारी २ ते २:३० या वेळेत दादा पाटील राजळे महाविद्यालय, आदिनाथ नगर येथील विद्यार्थिनी कु. स्नेहल नेहुल तसेच आयोजक कॉलेज मुख्यमंत्री सार्थक डोंबे, सोनई कॉलेजचे समन्वयक प्रा.राहुल निपुंगे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले व कार्यशाळेतून मिळालेल्या मार्गदर्शनाबद्दल त्यांनी आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधींची माहिती मिळण्यासाठी आणि योग्य दिशा निश्चित करण्यासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळा उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. या मार्गदर्शन सत्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक पात्रता, कौशल्ये, आवडीनिवडी आणि उपलब्ध रोजगाराच्या संधी यांचा विचार करून योग्य करिअरची निवड कशी करावी, याबाबत मार्गदर्शन मिळाले. तसेच बदलत्या रोजगाराच्या संधी, स्पर्धात्मक युगातील आवश्यक कौशल्ये आणि भविष्यातील करिअरच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या विविध बाबींची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा समन्वयक डॉ. विलास सुद्रिक यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी अहिल्यानगर जिल्हा समन्वयक किशोर गायकवाड यांनी उपस्थित मान्यवर, विद्यार्थी, प्राध्यापक आणि सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांना योग्य वेळी योग्य करिअरची दिशा मिळावी, त्यांच्या क्षमतांची ओळख होऊन त्यानुसार करिअरची निवड करता यावी आणि उपलब्ध संधींचा प्रभावीपणे उपयोग करता यावा, या दृष्टीने ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरली. कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक आणि संबंधित कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकारात्मक आणि उत्साहपूर्ण वातावरणात कार्यशाळेची सांगता झाली.कार्यशाळा सुरळीत पार पाडण्यासाठी छत्रपती कॉलेजमधील करिअर संसद विद्यार्थ्यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यशाळा यशस्वी झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे, उपाध्यक्ष सौ.मेघाताई संदीप औटी, जिल्हा बँक संचालिका सौ. अनुराधाताई नागवडे, सर्व विश्वस्त, निरीक्षक सचिनराव लगड व सर्व सेवकांनी अभिनंदन केले.

# पावसाच्या दीर्घ खंडामुळे शेवगाव तालुक्यात दुष्काळसदृश स्थिती

**ताजनापूर योजनेतून खुटेफळ तलाव भरण्याची स्वाभिमानीची मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** पावसाने दीर्घ खंड घेतल्याने शेवगाव तालुक्यात खरीप पिके, पशुधन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शेतकऱ्यांनी मोठा खर्च करून पेरणी केलेली पिके पाण्याअभावी धोक्यात आली असून, तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शासनाच्या लागू निकषांनुसार तातडीने उपाययोजना कराव्यात, तसेच ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक एक व दोनमधून उपलब्ध पाणी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना देऊन खुटेफळ तलाव भरून द्यावा, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने युवक प्रदेशाध्यक्ष मयूर बोरडे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार आकाश दहाडदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पावसाळ्याचे तीन महिने उलटूनही समाधानकारक पाऊस न झाल्याने खरीप हंगामातील कापूस, सोयाबीन, तूर, मूग, उडीद आदी पिकांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत आहे. पावसाच्या खंडामुळे पिकांना आवश्यक ओलावा मिळत नसल्याने उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्याच्या खरीप पिकांचे तातडीने पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी, नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये, यासाठी अशा शेतकऱ्यांना सरसकट किमान दोन लाख रुपयांचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात यावा. तसेच पात्र शेतकऱ्यांचा संपूर्ण कर्जबोजा दूर करून सरसकट कोरा उतारा देण्याची मागणी शासनाकडे पाठवावा. मागील वर्षीच्या कापूस व तूर पिकाचा प्रलंबित पीकविमा शेवगाव तालुक्यातील संबंधित महसूल मंडळांमधील पात्र शेतकऱ्यांना सरसकट मंजूर करून तातडीने वितरित करावा. पीकविमा कंपनी तसेच संबंधित विभागाकडील प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा.



ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक दोनचे पाणी तातडीने लाभक्षेत्रात सोडावे. विशेषतः घोटण व परिसरातील शेतकऱ्यांना पूर्ण दाबाने पाणी उपलब्ध करून द्यावे. तसेच ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक एकमधील दोन्ही पाइपलाइन पूर्ण क्षमतेने सुरू करून तळणी व परिसरातील लाभधारक शेतकऱ्यांना पाणी द्यावे. खुटेफळ तलाव तातडीने पाण्याने भरून दिल्यास शेतीसह पिण्याचे पाणी, पशुधन व भूजलपातळीला मोठा फायदा होईल. पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेल्या गावांमध्ये तसेच वाड्या-वस्त्यांवर तातडीने पाणी टँकर सुरू करावेत. पशुधन वाचविण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी चारा डेपो सुरू करून जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध करून द्यावा. उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करून नदी, नाले, तलाव व बंधारे भरून देण्याचे नियोजन करावे. महसूल, कृषी, पशुसंवर्धन व जलसंपदा विभागासह स्वाभिमानी शेतकरी संघटना व शेतकरी प्रतिनिधींची तातडीने संयुक्त बैठक घेऊन गावनिहाय कृती आराखडा निश्चित करावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

**या सर्व मागण्यांची तातडीने दखल घेऊन शेतकरी, पशुधन व ग्रामीण जनतेला दिलासा द्यावा. प्रशासनाने तातडीने कार्यवाही न केल्यास शेतकऱ्यांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष मयूर बोरडे यांच्यासह इतर पदाधिका-यांनी दिला आहे.**

यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब लवांडे, बाळासाहेब फटांगडे, जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फुंदे, मच्छिंद्र आर्ले, संतोष गायकवाड, बाळासाहेब गर्जे, अशोक भोसले , अमोल देवढे, बाबुराव सय्यद यांच्यासह पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

(पान १ वरून)

## कर्जतच्या माजी नगराध्यक्ष पतीला तोफखाना पोलिसांनी ठोकल्या बेड्या

व्यवसाय करतात. त्यांनी आपल्या मालकीची टोयोटा फॉर्च्युनर कार (एमएच १६ डीएम ८५९५) विक्रीस काढली होती. दिनांक ५ जुलै २०२५ रोजी प्रेमदान चौक येथील राज मोटर्सच्या ऑफिसमध्ये मध्यस्थ अभय गुजराथी व वीरेंद्र शेकटकर यांच्या समक्ष सचिन घुले आणि कृष्णा शिंदे यांच्यात ३४ लाख ५० हजार रुपयांना फॉर्च्युनरचा व्यवहार ठरला.

पूर्ण पैसे मिळाल्यानंतरच वाहनाची कागदपत्रे हस्तांतरित केली जातील आणि पैसे न मिळाल्यास एका महिन्यात वाहन परत केले जाईल, अशा अटीवर शिंदे यांनी विश्वासाने फॉर्च्युनरचा ताबा सचिन घुले यांच्याकडे दिला. त्यानंतर घुले यांनी टप्प्याटप्प्याने आणि बँकेच्या धनादेशाद्वारे काही रक्कम दिली. परंतु, ४ लाखांचा एक धनादेश खात्यात पुरेसे पैसे नसल्याने बाऊन्स झाला. घुले यांनी आतापर्यंत २४ लाख लाख रोख व मध्यस्थ अभय गुजराथी यांच्यामार्फत ३ लाख ९५ हजार रुपये, अशी एकूण २७ लाख ९५ हजार रुपयांची रक्कम शिंदे यांना दिली.मात्र, कराराप्रमाणे उर्वरित ६ लाख ५५ हजार रुपयांची रक्कम देण्यास घुले यांनी टाळाटाळ सुरू ठेवली.

पोलिसांनी या तक्रारीवरून आरोपी सचिन विठ्ठलराव घुले याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणाचा तपास तोफखाना पोलीस ठाण्याचे अधिकारी करत आहेत.

## श्रीरामपूर व राहाता तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

करण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध वाळू वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. या आदेशानुसार गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदार गणेश लोंढे, निळकंठ कारखेले, रणजीत जाधव, बाळासाहेब गुंजाळ आणि सतीष भवर यांचे विशेष पथक तैनात केले.पथकाने १ सप्टेंबर रोजी श्रीरामपूर तालुका व राहाता पोलीस स्टेशन हद्दीत गुप्त माहितीच्या आधारे दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत कारवाई दरम्यान ५ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी रोमन सलीम पठाण (वय २२, रा. सम्राटनगर, श्रीरामपूर) याला ताब्यात घेण्यात आले असून त्याचा साथीदार आकाश परदेशी (रा. आदर्शनगर, श्रीरामपूर) फरार झाला आहे. दुसऱ्या कारवाईत राहाता पोलीस ठाण्याच्या हद्दीतून १५ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात जावेद नजीर शेख (वय ३७, रा. पुणतांबा, ता. राहाता) आणि फरियाद उर्फ गुड्डू फिरोज शेख (वय २८, रा. श्रीरामनगर, शिर्डी) या दोघांना अटक करण्यात आली आहे. सर्व आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमांनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## महापालिका रुग्णालयाच्या आरक्षणावर खासगी हॉस्पिटलची परवानगी शासनाच्या रडारवर

नकाशा मागविला आहे. मौजे सावेडी येथील सर्वे नं. ९/२/१/२ व सर्वे नं. १२/४/१२/५ मधील जागा विकास आराखड्यात '-४३ ' म्हणून महापालिका रुग्णालयासाठी आरक्षित आहे. मात्र, याच जागेवर खासगी रुग्णालयासाठी भूखंड एकत्रीकरण, विकास परवानगी व बांधकाम परवानगीची प्रक्रिया करण्यात आल्याचा आक्षेप आहे. सावेडी परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरी वस्ती वाढलेली असून सार्वजनिक रुग्णालयाची गरज दिवसेंदिवस वाढत आहे. अशा परिस्थितीत महापालिका रुग्णालयासाठी आरक्षित जागेवर खासगी रुग्णालयाला परवानगी दिल्याने भविष्यात महापालिकेचे स्वतःचे रुग्णालय उभारण्याच्या मूळ उद्देशालाच अडथळा निर्माण होऊ शकतो, असा मुद्दा शासनाकडे मांडण्यात आला आहे. या परवानगी प्रक्रियेत महानगरपालिकेत शासनाकडून नियुक्त तत्कालीन सहाय्यक संचालक नगररचना श्रीमती स्नेहल यादव यांचा अभिप्राय व मान्यता न घेताच प्रस्ताव पुढे नेण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच संबंधित रुग्णालयासाठी संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांच्याकडून आवश्यक न घेता महापालिकेच्या अग्निशमन अधीक्षकांची ग्राह्य धरून पुढील परवानगी देण्यात आल्याची बाबही शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे. या प्रकरणी शेख यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे स्वतंत्र तक्रार केली होती. त्यानंतर अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी २२ जुलै २०२६ रोजी प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांना पत्र पाठवून, भ्रष्टाचाराच्या अनुषंगाने चौकशी आवश्यक असल्यास विभागाला प्राधिकृत करण्याची विनंती केली होती. मात्र, नगरविकास विभागाने ३१ जुलै २०२६ रोजी हे प्रकरण तपासणी व नियमानुसार कार्यवाहीसाठी पुन्हा अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्तांकडे पाठविल्याने शेख यांनी प्रधान सचिवांकडे लेखी आक्षेप घेतला. ''ज्या प्रशासनाच्या परवानगी प्रक्रियेची तक्रार आहे, त्याच प्रशासनाकडे चौकशी देणे निष्पक्ष चौकशीच्या तत्त्वाशी विसंगत आहे,'' असा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. या आक्षेपानंतर शासनाने प्रकरणाची व्याप्ती वाढवत **आयुक्त मनापा. संचालक नगररचना, ; सहसंचालक, नगररचना, सहाय्यक संचालक, नगररचना, **यांच्याकडून अहवाल व अभिप्राय मागविला आहे. शासनास सादर होणाऱ्या अहवालात -४३ चे महापालिका रुग्णालय आरक्षण अस्तित्वात असताना खासगी रुग्णालयाला परवानगी कोणत्या आधारावर देण्यात आली, आरक्षण बदल अथवा रद्द करण्याचा सक्षम आदेश आहे का, शासन नियुक्त नगररचना अधिकाऱ्याची मान्यता का घेण्यात आली नाही आणि महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालकांची नसताना महापालिकेची कोणत्या अधिकारात ग्राह्य धरण्यात आली, या बाबींवर खुलासा अपेक्षित आहे. अहिल्यानगर महानगरपालिकेचे नगररचनाकार वैभव जोशी आणि आयुक्त यशवंत डांगे यांच्या प्रशासकीय कार्यकाळात ही परवानगी प्रक्रिया झाल्याने संबंधित निर्णयांची स्वतंत्र व वरिष्ठ स्तरावर चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे सावेडीतील -४३ प्रकरण आता केवळ एका बांधकाम परवानगीपुरते मर्यादित राहिले नसून सार्वजनिक आरोग्यासाठी राखीव जमीन, नगररचना प्रक्रियेची वैधानिकता, अग्निसुरक्षा मंजुरी आणि प्रशासकीय जबाबदारी या सर्वच मुद्द्यांवर शासनाच्या परीक्षणाखाली आले आहे.

## लेखी आश्वासनानंतर खासदार नीलेश लंके यांचे उपोषण मागे

शिक्षण विभागानेही खासदार लंके यांच्या निवेदनातील जिल्हा परिषद स्तरावरील मागण्यांवर कार्यवाही सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच शाळानिहाय गुणवत्ताविषयक स्तंभालेख आठ दिवसांत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

खासदार लंके यांच्या उपोषणातील शासनस्तरावरील प्रमुख मागण्यांबाबत जिल्हा परिषद शिक्षण विभागाने शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय यांच्याकडे प्रस्ताव पाठविला आहे. शालेय पोषण आहार योजनेंतर्गत एफएसएसएआय नोंदणी मुख्याध्यापकांच्या नावाने न करता अन्न शिजविणाऱ्या यंत्रणा अथवा स्वयंपाकी यांच्या नावाने करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पोषण आहार शिजविणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करून ते किमान ७ हजार ५०० रुपयांपेक्षा अधिक करण्यात यावे, तसेच काम केलेल्या संपूर्ण कालावधीचे मानधन देण्यात यावे, अशीही मागणी प्रस्तावात करण्यात आली आहे.

आधार कार्डाअभावी विद्यार्थ्यांच्या प्रवेशात अडचणी येत असल्यास पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणीही शासनाकडे करण्यात आली आहे. शिक्षकांना अध्यापनाशी थेट संबंध नसलेल्या अशैक्षणिक कामांपासून मुक्त करून त्यांचा जास्तीत जास्त वेळ अध्यापनासाठी उपलब्ध करून द्यावा, हा खासदार लंके यांच्या आंदोलनातील महत्त्वाचा मुद्दा शासनाकडे पाठविण्यात आला आहे. अत्यावश्यक शासकीय कामांसाठी शिक्षकांची नियुक्ती करावी लागल्यास विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर परिणाम होणार नाही, अशी पर्यायी प्रशासकीय व्यवस्था निर्माण करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आणि मागण्या शासनस्तरावर पाठविण्यात आल्याने खासदार नीलेश लंके यांनी मंगळवारी उशिरा उपोषण मागे घेतले. मात्र, शिक्षकांच्या रिक्त पदांचा प्रश्न सुटेपर्यंत आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक उपाययोजना होईपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याची भूमिका त्यांच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

उपोषण स्थळी दादाभाऊ कळमकर, जिल्हाध्यक्ष सिताराम काकडे ,रामेश्वर निमसे, रामभाऊ झिने, सुशील बोर्डे, अभिजीत ससाने,प्रकाश पोटे,रघुनाथ झिने बाळासाहेब हराळ, बन्सी उबाळे, पोपटराव पुंड, नगरसेवक योगीराज गाडे, महादेवराव कोकाटे, शरद पवार, शिवा पाटील होळकर, शाम जरे, दिलीप वाळुंज अनिल जगताप आदी उपस्थित होते.जिल्हा परिषद चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री राहुल शेळके, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, माध्यमिकचे जिल्हा उपशिक्षणाधिकारी श्रीमती संध्या भोर, प्राथमिकच्या जिल्हा उपशिक्षणाधिकारी श्रीमती शिवगुंडे, शालेय पोषण आहारचे लेखाधिकारी, व इतर शिक्षण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## २ कोटी ५५ लाखांच्या विकासकामांना मंजुरी

सुनिता भिंगारदिवे, मंगल लोखंडे, आशाबाई कातोरे, डॉ. दिलीप बागल आदींसह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरातील विविध भागांतील ओपन स्पेसमध्ये महिलांसाठी ओपन जिमचे साहित्य बसविण्यासाठी ६४ लाख रुपयांची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच मुलांसाठी खेळणी बसविण्यासाठी ३४ लाख रुपये मंजूर करण्यात आले.

पाईपलाईन रोडलगत महापालिकेच्या मालकीच्या ओपन स्पेसमध्ये महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंची विक्री करण्यासाठी वस्तू विक्री केंद्र उभारण्यासाठी २० लाख रुपये तसेच भिस्तबाग येथील जागेवर वस्तू विक्री केंद्र उभारण्यासाठीही २० लाख रुपये मंजूर करण्यात आले.

अर्धांगवायू झालेल्या महिलांसाठी बेड खरेदी करून महापालिकेच्या आरोग्य केंद्रामार्फत रुग्णांना ते विनामोबदला उपलब्ध करून देण्यासाठी ५ लाख रुपये तरतूद करण्यात आली. महिला बचत गटांच्या विविध वस्तूंच्या विक्री प्रदर्शनासाठी तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी २५ लाख रुपये मंजूर करण्यात आले.

तसेच अंगणवाडी केंद्र उभारण्यासाठी २० लाख रुपयांच्या विकासकामांना महासभेत मंजुरी देण्यात आली.

यावेळी सभापती दिपाली बारस्कर म्हणाल्या की, महिला व बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महापालिकेच्या आरोग्य विभागामध्ये मानधनावर नर्स, भूलतज्ज्ञ व डॉक्टरांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच स्टेट बँक चौक व स्वस्तिक चौक परिसरात महिलांसाठी स्वच्छतागृह तसेच पिंक ग्राउंडची निर्मिती करण्यात यावी. दिवाळी सणाच्या काळात महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना मोठी बाजारपेठ मिळावी, यासाठी वस्तू विक्री प्रदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महापालिकेच्या शाळांमध्ये सुधारणा करण्यासाठी सात शाळांच्या खोल्यांची दुरुस्ती करण्यात येणार असून, या ठिकाणी स्वच्छतागृह व लॅबची निर्मिती केली जाणार आहे. शासनाच्या वतीने उत्कृष्ट शाळा म्हणून स्पर्धेचे आयोजन केले जाणार असून, यामध्ये पहिले पारितोषिक १० कोटी, दुसरे ७ कोटी व तिसरे ५ कोटी रुपये दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शाळांच्या खोल्या दुरुस्तीसाठी शासनाने महापालिकेला ५ कोटी रुपयांचे अनुदान दिले असून, चांगल्या शाळा निर्माण करण्यासाठी हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे दिपालीताई बारस्कर यांनी सांगितले.

उपसभापती वर्षा सानप म्हणाल्या की, महिला व बालकल्याण समितीची पहिली सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली असून, विविध विषयांवर चर्चा करून अनेक विषयांना मान्यता देण्यात आली आहे.